नागपूर, शुक्रवार,
१३ मे २०२२



नागपूर सकाळ

अवती भवती



नागपूर : हेतवी पटेल हिचा गौरव करताना प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे.

# आर.एस. मुंडलेची विद्यार्थिनी हेतवी पटेलचा कविता क्षेत्रात विश्वविक्रम

नागपूर : आर.एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी हेतवी पटेल हिने नुकताच अनोखी कविता क्षेत्रात विश्वविक्रम केला. महिलांचे कठोर परिश्रम आणि महिलांमधील विशेष गुण या विषयावर हेतवी पटेल हिने १०४ ओळींची एक विशेष कविता लिहिली आहे. या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या प्रत्येक कडव्याची सुरुवात ही इंग्रजीतील ए पासून झेडपर्यंत आहे. इन्कझाईड बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि ग्लोरिअस बुक ऑफ रेकॉर्डस या दोन्ही रेकॉर्डसमध्ये हेतवी पटेल हिने आपले नाव नोदवून विश्वविक्रम केला. महाविद्यालयातर्फे पुष्पगुच्छ आणि एक पुस्तक भेट देऊन तिचे कौतुक करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे यांनी हेतवी पटेल हिचा सत्कार करून तिच्या कवितेचेही कौतुक करत शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

4/6/21

The Hitavada

# State-level on-line webinar from today

TWO-DAY State-level on-line webinar will be organised on June 4 and 5, 2021 with an aim to empower the students to cope with the effects of COVID-19. The event is jointly organised by RTM Nagpur University, National Service Scheme Department and RS Mundle Dharampeth College of Arts and Commerce College, NSS Department. The theme of this webinar is 'Building a Resilient community in the COVID-19 era: Role of Social responsibility and Leadership'.

The webinar will be attended by NSS volunteers and programme officers from all the affiliated colleges of RTM Nagpur University. The webinar will be inaugurated at the hands of President, Dharampeth Education Society, Adv Ulhas Aurangabadkar, while Dr Sanjay Dudhe, Pro-Vice Chancellor of RTMNU will be the chief guest. Principal Dr Tanuja Nafde will preside over the event.

तरुण भारत

नागपूर, शनिवार, २६ फेब्रुवारी २०२२






# आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालयात रोजगार शिबिर

**नागपूर, २५ फेब्रुवारी**

आर. एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयात मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या सहकार्याने एक दिवसीय रोजगार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे, ग्रंथपाल व रोजगार नियुक्ती अधिकारी डॉ. मंजू दुबे, मॅजिक बस फाऊंडेशनच्या कार्यक्रम अधिकारी ममता माहेश्वर यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाले. ममता माहेश्वर यांनी नोकऱ्या व संधी याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. तनुजा नाफडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. मंजू दुबे यांनी प्रास्ताविक केले. ३३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. १७८ विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्या. मानव संसाधन, माहिती व तंत्रज्ञान, बँकिंग व फायनान्स, मार्केटिंग आदी विविध क्षेत्रांतील नामवंत कंपन्यांचे अधिकारी मुलाखत घेण्यासाठी आले होते.

प्रा. मयूर जलवानिया, प्रा. समीर कुडुपले, प्रा. जागृती पांडे, प्रा. दीपलक्ष्मी भट, प्रा. दीपक जेजानी, मॅजिक बस फाऊंडेशनचे व्यवस्थापक मोहम्मद शादाब, पंकज चौधरी तसेच कर्मचाऱ्यांचे शिबिरासाठी सहकार्य लाभले.

*(तभा वृत्तसेवा)*

The Hitavada NAGPUR ■ Wednesday ■ June 2 ■ 2021

# Two-day State-level on-line webinar from 4th

■ So far, one thousand students have registered on-line for this webinar and the registration will continue till June 3

■ **Staff Reporter**

TWO-DAY State-level on-line webinar will be organised on June 4 and 5, 2021 with an aim to empower the students to cope with the effects of COVID-19. The event is jointly organised by R.T.M Nagpur University, National Service Scheme Department and RS Mundle Dharampeth College of Arts and Commerce College, NSS Department. The theme of this webinar is 'Building a Resilient community in the COVID-19 era: Role of Social responsibility and Leadership'.

The webinar will be attended by NSS volunteers and programme officers from all the affiliated colleges of RTM Nagpur University. The webinar will be inaugurated at the hands of President, Dharampeth Education Society, Adv Ulhas Aurangabadkar, while Dr Sanjay Dudhe, Pro-Vice Chancellor of RTM Nagpur University will be the chief guest. Principal Dr Tanuja Nafde will preside over the event.

The webinar will be held in three sessions and the first speaker will be Mahesh Pohnerkar, Chief Executive Officer of Viveka Group, Pune and hard core social worker. Dr Prashant Nikhade, President of Vidarbha Association of Otolaryngologistas will guide on mucor mycosis, while Dr Girish Charade, well-known paediatrician will guide on the changing nature of Covid virus.

So far one thousand students have registered on-line for this webinar and the registration will continue till June 3. However, Dr Sopandev Pise, Director, NSS, RTM Nagpur University and Dr Satish Chaple, NSS programme officer of RS Mundle, Dharampeth College of Arts and Commerce, has urged more and more students and NSS programme officials to participate in this webinar.

Dr Manju Dubey, Dr Varsha Jape, Prof. Murlidhar Jambhulkar and other members of the organising committee are working hard for the success of the programme.

तरुण भारत नागपूर, मंगळवार, ३ मे २०२२

# भारतीय अर्थव्यवस्था मजबूतच

## • सतीश मराठे यांचा विश्वास • अमृत व्याख्यानमाला



सतीश मराठे बोलताना. शेजारी ॲड. उल्हास औरंगाबादकर व डॉ. तनुजा नाफडे

◆ नागपूर, २ मे

कोरोना साथीच्या पृष्ठभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होऊन समोर येईल, असा भक्कम विश्वास भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य सतीश मराठे यांनी आज येथे व्यक्त केला.

आर.एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयातर्फे अमृत व्याख्यानमालेंतर्गत आज सतीश मराठे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. धरमपेठ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर व प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. सतीश मराठे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय नाणे निधीची नुकतीच एक बैठक झाली. त्यात प्रामुख्याने जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकास वृद्धी दरावर चर्चा झाली. जागतिक ग्लोबल रेट साधारण ३ ते ३.५ टक्के राहील. किंबहुना कोरोना साथीमुळे तो सर्वच देशात कमी राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला.

प्रत्यक्षात २०२२-२३ची सर्वात गतिशिल अर्थव्यवस्था (फास्टेस्ट इकॉनॉमी) भारताची अर्थव्यवस्था ओळखली जाते. भारतात हा वृद्धी दर ७.४ टक्के असा अंदाज व्यक्त होत असला तरी भारतीय रिझर्व्ह बँकेला तो ७.९ राहील, असे वाटते. प्रत्यक्षात तो ७.५० टक्केपेक्षा कमी राहील, अशी शक्यता नाही. चलनवाढीचा (महागाई) दरसुद्धा जास्त आहे. त्याचे कारण पेट्रोलियम किमती वाढत आहेत. कोरोना साथ व युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. पुरवठा साखळीत चीनचा वाटा मोठा आहे. भारतही आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

कोरोनाच्या कठीण काळात व त्यानंतरही भारतीय अर्थव्यवस्था सर्वार्थाने गतिशील राहिली, हे सांगताना सतीश मराठे म्हणाले की, वंदेभारत रेल्वेसाठी चाके युक्रेनहून येतात. तेथे युद्ध सुरू झाल्यानंतर सर्व भारतीयांना सुखरूप आणले तसे ही चाकेही आणण्याची व्यवस्था भारत सरकारने केली. कोरोना साथ नियंत्रणात आल्यानंतरच्या काही महिन्यात भारतात ६ कोटींहून अधिक प्राप्तिकर विवरणे सादर झाली. जीएसटी प्रणाली विक्रमी कालावधीत स्थिर झाली, उत्पादन वाढले, एप्रिल महिन्यात १ लाख ६० हजार कोटी जीएसटी गोळा होणे, आयबीसीच्या रूपाने रिकव्हरी वाढणे, रेरा आदी व इतरही बाबी पाहता कोरोना साथीनंतर भारतीय अर्थव्यवस्था मजबुत होऊन बाहेर पडेल, यात शंका नाही, असे मत सतीश मराठे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन मंजुश्री सरदेशपांडे यांनी केले.

◂(तभा वृत्तसेवा)

नागपूर, शुक्रवार, ६ मे २०२२

सकाळ

## अवतीभवती



अमृतव्याख्यानमालेचे उद्घाटन करताना मान्यवर.

# भारतीय अर्थव्यवस्था गतिशील राहील:मराठे

**नागपूर :** कोरोना काळात विस्कळित झालेला रोजगार व्यवसाय, आयात निर्यातीवर झालेला परिणाम, चलनवाढीचा वाढता दर या विपरीत परिस्थितीत सुद्धा भारतीय अर्थव्यवस्था सक्षम होताना दिसत आहे. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा भारतीय अर्थव्यवस्था गतिशील राहील, असा विश्वास सतीश मराठे यांनी आपल्या व्याख्यानातून व्यक्त केला. नॉर्थ अंबाझरी रोड येथील आर. एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालयातर्फे अमृत व्याख्यानमालेतर्गत सतीश मराठे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य सतीश मराठे, धरमपेठ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर व प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविकेत प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे म्हणाल्या की, २००५ पासून आर. एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालयात अमृतव्याख्यानमालेचे आयोजन सातत्याने करण्यात आले आहे. सामाजिक जागरूकता, समाज प्रबोधन, आणि सजग शिक्षित समाजाची निर्मिती हे या अमृतव्याख्यानमालेतील प्रमुख उद्दीष्ट आहे. अनेक नामवंत वक्त्यांनी ज्वलंत विषयावर विचार मांडले आहेत. संचालन प्रा. डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी केले. आभार प्रा. गोविंद भट्टा यांनी मानले.

epaper.lokmat.com
नागपूर, मंगळवार, दि. ३ मे २०२२
लोकमत

# महामारीच्या उत्तरार्धानंतर शक्तिशाली अर्थव्यवस्था म्हणून 'भारतउदय'

## सतीश मराठे : 'इंडियन इकॉनॉमी : पोस्ट पॅण्डेमिक' विषयावर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : कोरोनामुळे जिथे अमेरिका, युरोपसारख्या अर्थव्यवस्था ढासळल्या तिथे भारतीय अर्थव्यवस्था तग धरून होती. एवढेच नव्हे तर सरकारच्या प्रयत्नाने महामारी, लसीकरण, भय अशाही स्थितीत आपली व्यवस्था संतुलित राहावी, असे प्रयत्न केले आहेत आणि त्याचे परिणाम दिसत आहेत. त्यामुळे कोरोना संक्रमणाच्या उत्तरार्धानंतर भारत ही जगातील सर्वांत शक्तिशाली अर्थव्यवस्था म्हणून उदयास येणार, असे वक्तव्य भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक मंडळ सदस्य सतीश मराठे यांनी केले.

धरमपेठ शिक्षण संस्थेच्या वतीने आर.एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित अमृत व्याख्यानात सोमवारी सतीश मराठे यांचे 'इंडियन इकॉनॉमी : पोस्ट पॅण्डेमिक' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी त्यांनी वर्तमानातील जगातील अर्थव्यवस्था व भारतीय अर्थव्यवस्थेचे तुलनात्मक परिणाम व प्रभाव आकडेवारीसह सादर केले. व्यासपीठावर धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. उल्हास औरंगाबादकर व आर.एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रधानाचार्य डॉ. तनुजा नाफडे आदी उपस्थित होते.

तज्ज्ञांनी सादर केलेल्या आकडेवारीनुसार कोरोना महामारीनंतर सर्व देशांच्या एकूण अर्थव्यवस्थेचा ग्रोथ रेट ३.५ टक्के इतका राहणार आहे. त्यात भारताचा ग्रोथरेट ७.५ इतका दिलेला आहे. त्याअनुषंगाने आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा जगभरातील इकॉनॉमीमध्ये वाढता दरारा बघता २०२२-२३ मध्ये भारत ही जगातील सर्वांत वेगवान अर्थव्यवस्था असेल, असे भाकीत सतीश मराठे यांनी यावेळी केले. जगभरात मुद्रास्फिती दर प्रचंड वाढत आहे. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती, कोरोनाने उद्ध्वस्त केलेले व्यवहार आणि रशिया-युक्रेनदरम्यानचे युद्ध याला कारणीभूत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यवहाराची सप्लाय चेन पूर्णत: डिस्टर्ब झालेली आहे. अशा स्थितीत भारताकडून साधले जात असलेले संतुलन, आंतरराष्ट्रीय व्यवहारात सूचिबद्धता, सोबतच देशाच्या अंतर्गत सुरू असलेली पायाभूमी विकासाची गती, त्याअनुषंगाने सरकारी गुंतवणूक, परदेशात वाढत असलेली भारतीयांची गुंतवणूक आदी गोष्टी भारताला इतर देशांच्या वर स्थान प्राप्त होत आहे. आयातील पर्याय देऊन आयातीवरील निर्भरता कमी करत 'मेक इन इंडिया - मेड इन इंडिया'ला प्रोत्साहन देण्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होणार असल्याचे सतीश मराठे यावेळी म्हणाले.

# देश कठीण परिस्थितीतून जातोय

## आरबीआय संचालक मंडळ सदस्य सतीश मराठे यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'जगात सर्वात सक्षम आणि मोठी अर्थव्यवस्था भारताची आहे. मात्र, सध्या भारत हा कठीण परिस्थितीतून जात आहे. त्यातून सावरण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत', असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य सतीश मराठे यांनी केले. आर. एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयातर्फे अमृत व्याख्यान अंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी 'इंडियन इकॉनॉमी-पोस्ट पॅण्डेमिक' विषयावर त्यांनी प्रकाश टाकला.




भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य सतीश मराठे यांचे स्वागत करताना ॲड. उल्हास औरंगाबादकर. शेजारी डॉ. तनुजा नाफडे.

याप्रसंगी मंचावर धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर यांची प्रमुख उपस्थिती होती. भारत आणि भारतीय अर्थव्यवस्था यावर बोलताना सतीश मराठे म्हणाले, 'देशाची अर्थव्यवस्था मजबूत आणि सक्षम करण्यासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना केंद्र सरकार राबवित आहे. सर्वच क्षेत्रामध्ये योग्य ते बदल करून डिजिटल व्यवहारावर भर देण्यात येत आहे. भारत सध्या रोजगारक्षम आणि उत्पादनक्षम राष्ट्रनिर्मितीकडे सकारात्मक पाऊल टाकत आहे. २०२२-२३मध्ये आपली अर्थव्यवस्था ही सर्वात जलद अशी असणार आहे. वंदे भारत, गतीशक्ती, आत्मनिर्भर भारत यासारखे उपक्रम भारतीय अर्थव्यवस्थेला सक्षम करण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत.' व्याख्यानादरम्यान मराठे यांनी अर्थव्यवस्थेच्या विकास वृद्धीबाबत सविस्तरपणे सांगितले. करोनानंतर महागाईने डोके वर काढले आहे. पेट्रोलियम पदार्थांच्या किमती झपाट्याने वाढत आहेत. करोनाकाळात विस्कळीत झालेला रोजगार, व्यवसाय, आयात-निर्यातीवर झालेला परिणाम, चलनवाढीचा वाढता दर या विपरित परिस्थितीतसुद्धा भारतीय अर्थव्यवस्था गतीशील राहील, असा विश्वास मराठे यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे यांनी, २००५पासून महाविद्यालयात अमृत व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी केले, तर प्रा. गोविंद भट्टा यांनी आभार मानले.

# नागपूर विद्यापीठातील संशोधनाचा प्रभाव जगभरात

## जागतिक पातळीवर दखल : 'स्कोपस'लिस्टेड अमेरिकन जर्नलमध्ये प्रकाशित

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. १४ : गेल्या ३० वर्षांत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विज्ञान विभागातील प्राध्यापकांनी नेत्रदीपक संशोधन केले असल्याचे समोर आले आहे. या संशोधनाची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली आहे.

याबाबत विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. पूजा दाढे आणि आर. एस. मुंडले धरमपेठ कला, वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. मंजू दुबे यांनी 'स्कोपस'लिस्टेड अमेरिकन जर्नलमध्ये पेपर प्रकाशित केला आहे.

विद्यापीठाची स्थापना १९२४ साली करण्यात आली. विद्यापीठ परिसरात विविध विभागांची निर्मिती करण्यात आली. या विभागांमध्ये औषधनिर्माणशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित यासह ४२ पेक्षा अधिक विभागांची निर्मिती करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने संशोधनाकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यातूनच १९९० ते २०१९ यादरम्यान विद्यापीठातील विज्ञान शाखेच्या विभागांमध्ये नेमके कोणते संशोधन झाले, त्यातून नेमके काय बाहेर पडले, त्या संशोधनाचा जागतिक स्तरावर काय प्रभाव आहे



याची माहिती घेण्यात आली. गेल्या ३० वर्षांत विद्यापीठाच्या विज्ञान विभागातून २ हजार २२९ संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आलेत. त्याचा वार्षिक विकास दर ६.२३ टक्के इतका आहे. त्यात सर्वाधिक ७२४ संशोधन हे भौतिकशास्त्र विभागाद्वारे करण्यात आले आहे. त्यानंतर रसायनशास्त्र विभागात ४७२ संशोधनांचा समावेश आहे. याशिवाय इतरही विज्ञान शाखांतील विभागांचा समावेश आहे. त्यामुळे निश्चितच विद्यापीठांमध्ये

**सर्वाधिक रिसर्च पेपर प्रकाशित करणारे विभाग**

| | |
|---|---|
| भौतिकशास्त्र | ७२४ |
| रसायनशास्त्र | ४७२ |
| औषधीनिर्माणशास्त्र | ११८ |
| अभियांत्रिकी विज्ञान | ११० |
| बायोकेमिकल सायन्सेस | ८६ |

उच्च प्रतीचे संशोधक केले जाते. विशेष म्हणजे, या संशोधनाची दखल अमेरिका, इंग्लंड, चीन, कोरिया, जपान, इटली, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, मोरोक्को, दक्षिण आफ्रिका, इराण, स्लोव्हाकिया, कतार, स्वित्झरलँड यांसारख्या देशांतील संशोधकांनी घेतल्याचे दिसून येते.

> **विद्यापीठाच्या विज्ञान विभागातून उच्च प्रकारचे संशोधन आतापर्यंत करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यापीठाचा नावलौकिक जगभरात झाल्याचे दिसून येते. 'स्कोपस'लिस्टेड अमेरिकन जर्नलमध्ये प्रकाशित संशोधन पेपरमध्ये ते सिद्ध झाले आहे.**
>
> **-डॉ. पूजा दाढे,** प्राध्यापिका, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग

### विद्यापीठाकडून अधिक प्रयत्न व्हावे

संशोधन पेपरमध्ये करण्यात आलेल्या अभ्यासानुसार असे आढळले आहे की, काही विभाग उच्च प्रतीचे संशोधन करीत आहेत. याशिवाय त्यामधील प्राध्यापकांचे बरेच संशोधन पेपर नामांकित संशोधन प्रकाशनात प्रकाशित करण्यात आले आहेत. यामुळे नागपूर विद्यापीठाच्या एकूण संशोधनात विज्ञान शाखेचे मोठे योगदान प्रतिबिंबित होते. यामध्ये प्रामुख्याने भौतिकशास्त्र विभागातील डॉ. एस. व्ही. मोहरील आणि त्यानंतर डॉ. संजय ढोबळे यांचा समावेश आहे. संशोधनाचा टक्का वाढविण्यासाठी विज्ञान विषयातील संशोधनाला चालना देण्यासाठी अधिक प्रयत्न विद्यापीठाकडून करण्याची अपेक्षा आहे.

October 28 ■ 2021 Hitavada

# State-level Book Review Contest marks Dr APJ Abdul Kalam's birth anniversary

TO MARK the birth anniversary of former President of India and 'Missile Man' Dr A P J Abdul Kalam, a State-level Book Review Competition was organised on-line jointly by R S Mundle Dharampeth Arts and Commerce College and Library Department of Seth Kesarimal Porwal College of Arts Science and Commerce, Kamptee, recently. The competition, organised on 'Vachan Prerna Diwas', received enthusiastic response from participants.

The winner of the first prize was Aishwarya R Mishra from Tirpude College of Social Work, Nagpur, while the second prize winner was Mithila Patil from HPT Arts and RYK Science College, Nashik.

The third prize was won by Anjali Shukla from S K Porwal College of Arts, Commerce and Science, Kamptee. Two consolation prizes were given to Tapan Jamuda of Hislop College, Nagpur, and Swati Rahulkar of R S Mundle Dharampeth College, Nagpur. Principal of Porwal College Dr M B Bagde and R S Mundle College's Principal Dr Tanuja Nafde congratulated the winners and participants and encouraged them to participate in such competitions to gain knowledge and improve talent and skills.

Dr Manju Dubey, Librarian of R S Mundle College, and Shilpa Hirekhan, Librarian of S K Porwal College, took special efforts to make the competition successful.

# मातृभाषेतून मिळालेले शिक्षण प्रभावी

## मंजूश्री सरदेशपांडे यांचे प्रतिपादन

## आज मिळणार उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

◆ नागपूर, ४ सप्टेंबर

'शब्दाचे मूळ कळले तर वाक्य कळते' इतर भाषा जाणून, समजून घेण्यासाठी मातृभाषा ही उत्तम साधन म्हणून वापरली जायला हवी; तरच विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण प्रभावी ठरेल, असे मत ज्येष्ठ प्राध्यापिका व शिक्षण तज्ज्ञ डॉ. मंजूश्री सरदेशपांडे यांनी मांडले.

डॉ. मंजूश्री सरदेशपांडे एक आनंदी-उत्साही, अभ्यासू, जिज्ञासू व्यक्ती;



व्यवसायाने शिक्षिका आणि मनाने विद्यार्थी. लहानपणापासूनच शिक्षणाची आवड असल्याने सगळ्या गोष्टींकडे अत्यंत जिज्ञासेने बघणे हा छंद जोपासल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाविषयी बोलताना त्या म्हणाल्या, १९९१ पासून शिक्षण क्षेत्रात आहेत. न्यू इंग्लिश शाळेत शिक्षिका म्हणून त्यांनी करिअरची सुरुवात केली व सध्या धरमपेठ वाणिज्य महाविद्यालयात त्या प्राध्यापिका आहेत.

शिक्षणाची आवड कशी निर्माण झाली हे विचारले असता त्या म्हणाल्या, माहेरी असताना बागकाम करताना निर्माण झालेली आवड इतक्या मोठ्या पदावर नेईल असे वाटले नव्हते. त्या एक उत्तम कवी असून, अनुवादिकाही आहेत.

मंजूश्री सरदेशपांडे यांचे वडील, उत्तमराव बुटी नागपुरातील एक प्रतिथयश व्यक्तिमत्त्व. ते चालता बोलता ज्ञानकोष होते आणि त्यांचे प्रेरणास्थानही.

डॉ. मंजूश्री सरदेशपांडे यांनी 'केजी टू पीजी' असा अभ्यासक्रम विशेष स्वरूपात तयार केला आहे. 'मॅन फिअर्स मॅन' ही त्यांची कविता दहावीच्या पाठ्यपुस्तकासाठी निवडली गेली असून, ती २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यावर आधारित आहे. त्यांना अमेरिकेची 'इंटिग्रेटेड इंटरनेट इंटू क्लासरूम अँड टीचिंग इंग्लिश टू यंग' ह्याविषयी ई-स्कॉलरशिप मिळाली आहे. नागपूर विद्यापीठ आणि कालिदास विद्यापीठासह विविध विद्यापीठांच्या अनेक परिषदा व बोर्ड ऑफ कौन्सिलशी डॉ. सरदेशपांडे संलग्न आहेत.

(तभा वृत्तसेवा)

### कला शाखेतील पहिला पुरस्कार

५ सप्टेंबरला राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून त्यांना पुरस्कृत केले जाणार आहे. हा पुरस्कार यापूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना देण्यात येत असे. पहिल्यांदाच कला शाखेच्या ज्येष्ठ प्राध्यापिका व शिक्षण तज्ज्ञ डॉ. मंजूश्री सरदेशपांडे यांना तो देण्यात येणार आहे हे विशेष.

www.tarunbharat.net
तरुण भारत
नागपूर, शनिवार, २६ फेब्रुवारी २०२२

# समरसतेसाठी प्रत्येकाचा सहभाग गरजेचा

## सुनील आंबेकर यांचे विचार

### मनोरमाबाई मुंडले स्मृती व्याख्यान




सुनील आंबेकर यांच्या हस्ते सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार स्वीकारताना भंडारा येथील भटके-विमुक्त कल्याणकारी संस्थेचे पदाधिकारी. शेजारी उल्हास औरंगाबादकर, रत्नाकर केकतपुरे, डॉ. कुमार शास्त्री

◆ नागपूर, २५ फेब्रुवारी

समरस भारताची संकल्पना व निर्माणासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीचा, घटकाचा सहभाग अत्यावश्यक आहे, असा विचार रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी आज येथे व्यक्त केला.

धरमपेठ शिक्षण संस्थेतर्फे आयोजित मनोरमाबाई मुंडले स्मृती व्याख्यानात सुनील आंबेकर यांनी 'समरस भारत- संकल्पना आणि निर्माण' विषयावर विचार व्यक्त केले. धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, उपाध्यक्ष संजय देशपांडे, सचिव रत्नाकर केकतपुरे तसेच पुरस्कार समितीचे सदस्य डॉ. कुमार शास्त्री यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुनील आंबेकर म्हणाले की, या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी सर्वस्व अर्पण केले. त्या सर्वांनी सुजलाम सुफलाम व समर्थ भारताची कल्पना मनात ठेवली होती. आपला देश कसा असावा, यावर मोठ्या प्रमाणात विचार मंथन सुरू होते. मते वेगवेगळी होती. पण, हा देश समरस होऊन, एकोप्याने पुढे जाईल, यावर एकमत होते.

परस्पर आत्मीयतेचा भाव उत्पन्न होईल तेव्हाच एकोपा निर्माण होईल. पण, मनुष्यात सद्‌गुण, प्रामाणिकता आहे, तसा स्वार्थ वगैरे दोष प्रत्येकात असतो. भावनांचा खेळ मनात चालत असतो. यातून उत्तम गुणांना वर कसे आणायचे, याचे खुप प्रयत्न झाले. चारित्र्यवान लोकांची एकता, चारित्र्यवान राष्ट्रच दूरगामी राहू शकते. असेच समर्थ राष्ट्र बनते.

प्रत्येक समाजात दोष असतातच. ते निवारण्याचे सातत्याने प्रयत्न आजही सुरू आहेत. हे देश समरस होण्यासाठी आवश्यकही आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक संतांनी असे प्रयत्न केले. समाजातील दुही संपविण्यासाठी अनेक क्रांतिकारी उपक्रम राबविले गेले. हे तेवढे सोपे नव्हते, याकडेही सुनील आंबेकर यांनी लक्ष वेधले.

दलित-मुस्लिम एकतेची भाषा आजही लोक करीत आहेत. पण हा प्रयोग याआधीही झाला व तो कुचकामी ठरला. राजकीय प्रतिनिधित्व, आरक्षण या उपायांमुळे उपेक्षित, वंचिताना पुढे आणता आले. पण, तेवढ्याने होणार नाही. समाजाच्या सेवेचा भाव हवा. समरसतेसाठी समाजातील प्रत्येक घटकाचा, व्यक्तीचा सहभाग आवश्यक आहे. रा.स्व. संघ हेच करीत आहे, असे ते म्हणाले.

प्रारंभी, उल्हास औरंगाबादकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कुमार शास्त्री यांनी पुरस्कारासंदर्भात माहिती दिली. संचालन सौ. तांबोळी यांनी केले. रत्नाकर केकतपुरे यांनी आभार मानले.

◄ *(तभा वृत्तसेवा)*

### सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार

धरमपेठ शिक्षण संस्थेचा पहिला सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार भंडारा येथील भटके-विमुक्त कल्याणकारी संस्थेला सुनील आंबेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये व सन्मामचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून शेखर बोरसे, शिवा कांबळे व इतर पदाधिकाऱ्यांनी तो स्वीकारला. शिवा कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

www.tarunbharat.net
तरुण भारत सोमवार, ५ सप्टेंबर २०२

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालय

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक विकास व्हावा, चांगले संस्कार व्हावे तसेच शिक्षणासह चांगला विद्यार्थी आमच्या संस्थेतून बाहेरच्या जगात पडावा याच उद्देशाने आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालयाची वाटचाल सुरू असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. तनुजा नाफडे यांनी दिली.



प्राचार्या डॉ. तनुजा नाफडे

धरमपेठ शिक्षण संस्थेच्या वतीने संचालित आर. एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालय गेल्या अनेक वर्षांपासून नागपुरात सुसंस्कारित विद्यार्थी घडविण्याचे काम निष्ठापूर्वक करीत आहे. विद्यमान अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, सचिव रत्नाकर केकतपुरे व संस्थेचे इतर सर्व पदाधिकारी यांच्या सक्षम नेतृत्वात संस्थेचे काम सुरू आहे. आर. एस. मुंडले धरमपेठ कला- वाणिज्य महाविद्यालय हे नागपूर विद्यापीठाशी संलग्न असलेले एक नामवंत महाविद्यालय आहे. नॅकच्या माध्यमातून या महाविद्यालयाला 'अ' श्रेणी मिळाली असून सध्या महाविद्यालयात ३ हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कनिष्ठ महाविद्यालय, पदवी आणि पदव्युत्तरपर्यंतचे कला, वाणिज्य शाखांचे सर्व अभ्यासक्रम महाविद्यालयात आहेत. येथे सुमारे १०० अनुभवी विद्वान प्राध्यापक आणि सुमारे ५० कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेने तयार केलेले विद्यार्थी देशात आणि विदेशात विविध पदांवर आहेत. महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालय, उच्च शिक्षण संशोधन केंद्र, भाषा प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, पदव्युत्तर अभ्यासक्रम, एमबीए, वायसीएमओयूचे अभ्यासक्रम, व्यक्तिमत्त्व विकासासारखे प्रमाणपत्र कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी राबवीत आहे. विद्यार्थी पदवी घेऊन महाविद्यालयाबाहेर पडताना त्यांच्याजवळ मुलाखतीच्या ज्ञानासह इतर कोर्सेसचे प्रमाणपत्रही राहणार आहे. महाविद्यालयाच्या वतीने जॉब फेअरचे आयोजन केले जाते. यात विविध कंपन्यांमध्ये बहुतांश विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच महाविद्यालय सदैव तत्पर असल्याचे डॉ. तनुजा नाफडे यांनी सांगितले.

Hitavada

NAGPUR ■ Monday ■ January 31 ■ 2022

# Life - A tale told by an Idiot



ISN'T life seem to be a divine comedy....?! I mean most of the time what actually happens is we are pushed down to the least expected track...! We are all here to do our part and while doing so often it does seem that we are perturbed by the challenges thrown to our faces but I think the true meaning of life lies in our humble efforts and our zest to bounce back when we hit the bottom. Nobody on planet Earth can have it all figured out...! So take a pause there, take a brief moment and get back on the rails with all the potential restored.

Ruin is a gift; it is a road to transformation and we always must be prepared for the endless waves of transformation.

As someone has rightly said, "let the life happen as we ride the past with faulty brakes and a dangling rear view mirror..!"

A very beautiful yet striking thing I have come across is once love is given in this universe, it never goes wasted; it comes back to you when you need it the most, in a form that you have never known...!

As we swim off into this journey of life ahead new worlds unfold in front of us, in our wakefulness....! All the good, bad, life changing, jeopardizing episodes as run past our eyes we realize that each one of those being very enriching to our heart and more importantly to our soul. So, people life is a roller coaster ride meant to discover our hidden potentials, so let's take the wrong train and get stuck somewhere, do not look out for signs, do mistakes, mess everything up and then laugh endlessly after remembering these scenes of idiocy because as the great American-British novelist Raymond Chandler says, "Life is all about making the mistakes and death is about wishing you made a whole lot more...!"

So summing everything up let us appreciate the life with all that comes with it.

**Ashwini Sushil Kunjalwar**
BA 2nd Year
R S Mundle Dharampeth
Arts And Commerce College

तरुण भारत
नागपूर, शनिवार, २७ फेब्रुवारी २०२१ ३

# आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाचे आयोजन

◆ नागपूर, २६ फेब्रुवारी

युगांतर शिक्षण संस्थेद्वारे संचालित तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय आणि सहयोग क्लस्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजिण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवरायांच्या विचारांचे योगदान या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचे युग, शिवाजी महाराजांची स्त्रियांविषयीची नीती, शिवराय एक समाजसेवक, शिवाजी महाराज ते आजपर्यंतचे आपत्ती व्यवस्थापन आणि छत्रपती शिवरायांचा धर्मविषयक दृष्टिकोन हे स्पर्धेचे विषय होते. स्पर्धेचे उद्घाटन रातुम नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते झाले. संस्थेचे सरचिटणीस गणेश गौरखेडे प्रमुख अतिथी म्हणून, तर अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. स्वाती धर्माधिकारी उपस्थित होत्या. प्रास्ताविक डॉ. शिल्पा पुराणिक यांनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून विनोद मानकर, गुजाजी बर्डे आणि डॉ. विनिता हिंगे होते. उद्घाटनपर भाषणात डॉ. संजय दुधे म्हणाले, शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांची जीवनमूल्ये आपल्या प्रत्यक्ष जीवनात उतरवावी. शिवरायांनी त्याकाळी बलाढ्य अशा मुघल साम्राज्याशी लढा दिला. अवघ्या १७ व्या वर्षी त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. स्वाती धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांमध्ये एक आदर्श असण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक आर. एस. मुंडले महाविद्यालयाच्या आशुतोष तिवारीने पटकावले. द्वितीय पुरस्कार इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या चेतना भोसलेने तर उत्तेजनार्थ पारितोषिक मातृ सेवा संघ महाविद्यालयाच्या लोकेश सोनेने याने पटकावले. संचालन महाविद्यालयाचा विद्यार्थी रणजित बघेल याने केले. प्रा. सचिन हुगे यांनी आभार मानले.

◄(तभा वृत्तसेवा)

# भारतीय संस्कृतीत गुरूंचे महत्त्व अधिक

## • डॉ. अतुल वैद्य यांचे प्रतिपादन • नागपूर विद्यापीठात शिक्षक दिन

◆ नागपूर, ५ सप्टेंबर

प्राचीन काळात विद्यादान करणारे गुरू होते आणि आधुनिक काळात शिक्षक विद्यादानाचे काम करतात. नावे काहीही असली तरी भारतीय संस्कृतीत गुरूंचे महत्त्व अधिक असल्याचे प्रतिपादन नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त नागपूर विद्यापीठात आज शिक्षक व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजीव हिवसे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. वैद्य म्हणाले, कोणत्याही मुलाची पहिली गुरू ही आई असते. वयाच्या १४ वर्षापर्यंत मुले जे ग्रहण करतात ते आयुष्याच्या अंतापर्यंत टिकते. तेच ज्ञान देण्याचे काम आई बाळाच्या जन्मापासून करते म्हणून ती पहिली गुरू आहे.



डॉ. मंजूश्री सरदेशपांडे यांचा सत्कार करताना डॉ. अतुल वैद्य. सोबत डॉ. सुभाष चौधरी, डॉ. संजय दुधे व डॉ. राजू हिवसे

या कार्यक्रमात उत्कृष्ट प्राचार्य म्हणून डॉ. शरयू तायवाडे, उत्कृष्ट शिक्षक म्हणून डॉ. प्रमोद वाळके व डॉ. मंजूश्री सरदेशपांडे, उत्कृष्ट संशोधक म्हणून डॉ. नीतेश महाजन व डॉ. स्मिता आचार्य यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट समाजकार्यासाठी डॉ. मनोज भोरकर, लेखक डॉ. धनंजय गभणे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

आदर्श शिक्षण संस्था गटात बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी या संस्थेला गौरविण्यात आले. विद्यापीठ वार्षिकांक गटात वायसीसीई कॉलेज, रामदेवबाबा कॉलेज आणि श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयाना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. मागील दोन वर्ष कोविड केंद्रात कार्यरत विद्यार्थ्यांचा देखील यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. राजू हिवसे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

◄(तभा वृत्तसेवा)

नागपुर, 6 सितंबर 2022 | नवभारत

विवि में शिक्षक दिवस पर विविध पुरस्कार प्रदान

# ज्ञान के साथ अपग्रेड भी करें

■ नागपुर, महानगर संवाददाता. भारतीय परंपरा में शिक्षकों का महत्वपूर्ण स्थान है. बेहतरीन शिक्षा के साथ ही अपने ज्ञान को बढ़ाते रहना चाहिए. यह जीवनभर चलने वाली प्रक्रिया है. यह प्रतिपादन राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (नीरी) के संचालक अतुल वैद्य ने किया. शिक्षक दिवस के उपलक्ष्य में राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विवि की ओर से विवि के दीक्षांत सभागृह में शिक्षक पुरस्कार समारोह आयोजित किया गया. कार्यक्रम की अध्यक्षता उप कुलपति प्रा.सुभाष चौधरी उपस्थित थे. मंच पर प्र-उपकुलपति संजय दुधे व कुलसचिव डॉ.राजू हिवसे मौजूद थे. अध्यक्षीय भाषण में चौधरी ने कहा कि किसी समय का मोहताज नहीं है. वहीं एक बार पेशे में आने के बाद सेवानिवृत्ति के बाद भी शिक्षक ही रहता है. छात्रों को ज्ञान देना और उन्हें सर्वांगीण विकास की ओर ध्यान देना शिक्षकों की जिम्मेदारी है. प्रास्ताविक भाषण में प्र-उपकुलपति दुधे ने विवि के बारे में जानकारी दी. समारोह में विविध प्रवर्ग के शिक्षकों को पुरस्कृत किया गया. कार्यक्रम का संचालन अमृता इंदुरकर व आभार कुलसचिव डॉ.राजू हिवसे ने माना.




## तायवाडे, वालके, महाजन, आचार्य को पुरस्कार

इस दौरान विवि की ओर से उत्कृष्ट प्राचार्य का पुरस्कार शरयु तायवाडे को दिया गया. उत्कृष्ट शिक्षक के तौर पर प्रमोद वालके और मंजुश्री सरदेशपांडे को सम्मानित किया गया. उत्कृष्ट संशोधक का पुरस्कार निलेश महाजन और स्मिता आचार्य को प्रदान किया गया. उत्कृष्ट समाजकार्य मंगेश भोरकर तथा उत्कृष्ट लेखक का पुरस्कार धनंजय गभणे को दिया गया. अंबे दुर्गा एजुकेशन सोसाइटी को आदर्श शिक्षण संस्था का पुरस्कार मिला. वहीं उत्कृष्ट विद्यार्थी के रूप में सागर कोवाडे व राधा ठेंगडी को पुरस्कृत किया गया. सांस्कृतिक उपक्रम का पुरस्कार सुजाता राठोड और मेहंदी शेख को दिया गया. उत्कृष्ट एनएसएस कैडेट का पुरस्कार मोहन वरठी व नेहा कापगते को मिला. वहीं एनसीसी का पुरस्कार वैभव शेलके को प्रदान किया गया.

नागपूर, रविवार, १७ जुलै २०२२
www.tarunbharat.net
तरुण भारत

# 'कालजयी'ने उलगडले स्वा. सावरकरांचे पैलू


◆ **नागपूर, १६ जुलै**

'कालजयी' या दीर्घांकाद्वारे शनिवारी सायंटिफिक सभागृहात उपस्थित नागपूरकरांसमोर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आयुष्याचे विविध पैलू आणि अंतरंग उलगडण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने दिलीप भट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दीपश्री भट निर्मित आणि अंभ्रुणी सेवा संस्था, नटराज आर्ट्स अ‍ॅण्ड कल्चरल सेंटर, तसेच आर. एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त वतीने हा दीर्घांक आयोजित करण्यात आला होता.

सावरकरांचे आदर्श त्यांचे बंधू बाबाराव सावरकर आणि मातृतुल्य वहिनी येसूबाई यांच्यातील संवाद व डॉ. धनंजय मोडक यांनी संगीतबद्ध केलेल्या वि. दा. सावरकरांच्या कवितांवर प्रसंगोचित हे सादरीकरण होते.

द. म. सांस्कृतिक केंद्राचे संचालक डॉ. दीपक खिरवडकर, ज्येष्ठ नाट्यकलावंत व उद्योजक अजित दिवाडकर, धरमपेठ शिक्षण संस्थेचे पदाधिकारी आणि सावरकरप्रेमी उपस्थित होते. या कलाकृतीचे दिग्दर्शन स्वप्निल बोहटे यांचे असून, निर्मिती प्रमुख निखिल गोंधळेकर आहेत. डॉ. दीपलक्ष्मी भट, अ‍ॅड. गौरव खोंड, विनय मोडक यांच्या प्रमुख भूमिकांद्वारे सावरकरांच्या जीवनातील प्रसंग साकारण्यात आले. अवंती हर्षे काटे, आदिती गोंधळेकर, वृषाली साठे, कृष्णाई काटे या नृत्य कलावंतांचाही सहभाग होता.



संगीत कार्तिकेय ठाकरे, प्रकाश योजना ऋष मापोडकर, नेपथ्य असीधारा लांजेवार यांचे होते. समृद्धी कुळकर्णी, तेजस माहुलकर, सुमित डोंगरे, नितीन नस्तान, आदित्य ठाकरे व सहकाऱ्यांच्या सहकार्याने ही कलाकृती सादर करण्यात आली.

◀(तभा वृत्तसे

नागपूर, बुधवार, २ जून २०२१ ३
तरुण भारत

# द्विदिवसीय राज्यस्तरीय आभासी वेबिनार

◆ नागपूर, १ जून

राष्ट्रीय सेवा योजना नागपूर व आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड १९ च्या प्रभावाचा सामना करण्याचे बळ विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे, या हेतूने दोन दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन ४ व ५ जून रोजी करण्यात आले आहे. 'कोविड १९ च्या काळात संवेदनाक्षम समाज तयार करण्यासाठी स्वयंसेवकांचे सामाजिक उत्तरदायित्व व नेतृत्व' हा या वेबिनाराचा विषय आहे. या वेबिनारमध्ये सर्व महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत. वेबिनाराचे उद्घाटन धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर करतील, तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तनुजा नाफडे राहतील. हे वेबिनार तीन सत्रात संपन्न होणार असून, पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून पुणे येथील विवेका ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पोहणेरकर, म्युकरमायकोसिस या आजारावर डॉ. प्रशांत निखाडे, कोविडचे बदलते स्वरूप या विषयावर डॉ. गिरीश चरडे मार्गदर्शन करणार आहेत. आतापर्यंत या वेबिनारसाठी ऑनलाईन पद्धतीने एक हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, ३ जूनपर्यंत ही नोंदणी सुरू राहणार आहे. या वेबिनारमध्ये सहभागी होण्याचे आवाहन संयोजक डॉ. सोपानदेव पिसे व आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सतीश चाफले यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मंजू दुबे, डॉ. वर्षा जपे, प्रा. मुरलीधर जांभुळकर प्रयत्नरत आहेत.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

महाराष्ट्र टाइम्स । नागपूर । बुधवार, २ जून २०२१

# धरमपेठ कॉलेजमध्ये ४-५ला वेबिनार

**नागपूर :** आर. एस. मुंडले धरमपेठ कला आणि वाणिज्य कॉलेज येथे ४ आणि ५ जून रोजी राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. 'कोव्हिड-१९च्या काळात संवेदनाक्षम समाज तयार करण्यासाठी स्वयंसेवकांचे सामाजिक उत्तरदायित्व आणि नेतृत्व' विषयावर हा वेबिनार होणार आहे.

वेबिनारचे उद्घाटन धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. तनुजा नाफडे राहतील.

या वेबिनारच्या विविध सत्रांमध्ये 'म्युकरमायकोसिस आणि कोव्हिडचे बदलते स्वरूप' विषयावर मार्गदर्शन केले जाईल. आतापर्यंत एक हजार विद्यार्थ्यांनी या वेबिनारसाठी नोंदणी केली असून ३ जूनपर्यंत ही नोंदणी सुरू राहणार आहे. या वेबिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे तसेच धरमपेठ कॉलेजचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सतीश चाफले यांनी केले आहे. यशस्वितेसाठी डॉ. मंजू दुबे आणि प्रा. मुरलीधर जांभुळकर प्रयत्न करीत आहेत.

महाराष्ट्र टाइम्स ।
नागपूर । शनिवार, २६ फेब्रुवारी २०२२

# भेदाभेद हा धार्मिक नव्हे, सामाजिक दोष

## सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

भेदाभेद दूर करण्यासाठी सुरुवातीच्या काळापासून प्रयत्न झाले. समरसता निर्माण करण्यासाठी देशातील अनेक थोर पुरुषांनी पुढाकार घेतला. हा दोष धर्मातून आला नसून सामाजिक आहे. आधुनिक काळातही हे दोष दूर करण्यासाठी प्रयत्न झाले. धर्म बदलून ही समस्या सुटत नसल्याचेही दिसून आल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

धरमपेठ येथील आर. एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालयात शुक्र[illegible] मनोरमाबाई मुंडले स्मृती व्याख्[illegible]मालेंतर्गत आंबेकर यांचे 'समरस भारत-संकल्पना आणि निर्माण' या विषयावर व्याख्यान झाले. याच कार्यक्रमात भंडारा येथील भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेला सामाजिक सेवा शिल्पी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, उपाध्यक्ष ॲड. संजीव देशपांडे, कार्यकारिणी सदस्य डॉ. कुमार शास्त्री, सचिव रत्नाकर केकतपुरे आदी उपस्थित होते.

न्यायाचे राज्य निर्माण व्हावे यासाठी सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्राचा विचार करण्याची गरज आहे. चारित्र्यवान राष्ट्रच दुरगामी टिकू शकते. प्रत्येक समाजात दोष निर्माण होतात. हे दोष दूर करण्यासाठी प्रयत्न होतात की नाही हे महत्त्वाचे आहे. आपल्या देशातील



भंडारा येथील भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेला सामाजिक सेवा शिल्पी पुरस्कार प्रदान करताना सुनील आंबेकर. यावेळी ॲड. उल्हास औरंगाबादकर, रत्नाकर केकतपुरे, डॉ. कुमार शास्त्री, ॲड. संजीव देशपांडे उपस्थित होते.

संत परंपरेतूनही भेदाभेदाच्या विरोधात आवाज उठवून एकतेचा संदेश देण्यात आला. महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक अशा अनेक थोर पुरुषांनीही समरसतेसाठी मोठे योगदान दिले. समाज जिवंत असल्याचे हे लक्षण असल्याचे आंबेकर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता तांबोळी यांनी केले. आभार रत्नाकर केकतपुरे यांनी मानले.

आरक्षणामुळे सकारात्मक परिणाम

भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून वंचित घटकांचा मुख्य प्रवाहात समावेश करण्यात आला ही नक्कीच कौतुकास्पद बाब आहे. हा प्रवास अद्याप संपला नसून यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे. समरसता केवळ कायद्याने होऊ शकत नाही तर त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. आरक्षणामुळे सकारात्मक परिणाम झाला. आपल्या देशात झालेले असे तातडीचे प्रयत्न इतर देशात मात्र होताना दिसले नसल्याचे आंबेकर म्हणाले. जन्म-मृत्यूचे पुरावे नसल्याने आम्हाला जात प्रमाणपत्र मिळत नव्हते. भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेच्या पुढाकाराने साडेतीन हजार लोकांना लाभ मिळू शकला. इतर योजनांसाठीही असाच पुढाकार घेण्यात आल्याचे समाधान संस्थेचे जिल्हाप्रमुख शिवा कांबळे यांनी व्यक्त केले. संस्थेच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारी चित्रफितही यावेळी दाखविण्यात आली.